पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११ १८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक-नस/४/कावि/९८१/२०१२
दिनांक- १० / ०७ /२०१२

प्रति,
मा.........................................
सदस्य, पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८

विषय :- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा. महापालिका सभा दिनांक २० / ०७ / २०१२ रोजी दुपारी २.०० वाजता आयोजित केलेबाबत...

माननिय महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै- २०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०/०७/२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे ही विनंती.

आपला विश्वासू,

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- १) कार्यालयीन नोटीस बोर्ड
२) सर्व शाखाप्रमुख व शाखाधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

सूचना

[ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची प्रकरण २ मधील नियम क्रमांक १ (ए)(एच)(आय) अन्वये. ]

कार्यपत्रिका क्रमांक- ६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे जुलै- २०१२ ची मासिक मा.महापालिका सभा शुक्रवार दिनांक २०.०७.२०१२ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारती मधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आलेली आहे. सदर सभेमध्ये खालील कामकाज होईल.

----

प्रश्नोत्तरे

[ मुंबई प्रांतिक म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ४४ अन्वये ]

-----------

मा. स्थायी समितीचे ठराव

विषय क्रमांक १) संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/२६९/२०१२, दि.०७/०४/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक ०७/०५/२०१२ ठराव क्र.७
३) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.५७८ दि.१२/६/२०१२

नवीन दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी प्रस्तावासोबत सादर केलेल्या परिशिष्ठाप्रमाणे आवश्यक अशी पदे निर्माण करण्यास तसेच नगरसचिव कार्यालयातील लघुलेखकाच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता, नगरसचिव कार्यालयासाठी “लघुलेखक उच्चस्तर” अभिनामाची नवीन दोन पदे सुधारित वेतनश्रेणी ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे र.रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन ५४००/- या वेतनश्रेणीत पदोन्नतीने खाली दिलेल्या अर्हता व अटी - शर्ती मध्ये निर्माण करणेस, **अर्हता व अटी शर्ती -** १) लघुलेखन १२० श.प्र.मी. उत्तीर्ण असणे आवश्यक, २) मराठी टंकलेखन ४० श.प्र.मी. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मी. उत्तीर्ण असणे आवश्यक, ३) किमान एच.एस.सी (१२ वी) परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ४) MS-CIT परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, ५) नगरसचिव कार्यालयात लघुलेखक पदावर कामकाजाचा किमान ५ वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच मा. महापालिका सभा ठराव क्र. १२८, दि. ०६/१०/२००७ अन्वये ४ कार्यकारी अभियंता (स्थापत्य) या पदांची मंजुरी करुन महाराष्ट्र शासनाकडे मंजुरीकामी पाठविणेत आलेली आहे. तसेच मा. विधी समिती ठराव क्र.७, दिनांक ०७/०५/२०१२ अन्वये दोन जादा प्रभाग निर्माण करावयाचे असल्याने त्यासाठी कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची ६ (सहा) पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर सादर करणेत आलेला आहे. परंतु महानगरपालिकेचा विस्तार पहाता

आणखी १४ (चौदा) कार्यकारी अभियंता (स्थापत्य) यांची पदे अत्यावश्यक आहेत. म्हणजेच एकूण १४ (चौदा) कार्यकारी अभियंता (चौदा) पदांची निर्मिती होणे व मंजुरीकामी महाराष्ट्र शासनाकडे मंजूरीकामी पाठविणेस, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महापालिका सभा ठराव क्र. १६९७ दि.२७/११/१९९० अन्वये शहरांतर्गत दळणवळण व वाहतुकीचे नियोजन करणेसाठी वाहतूक घटक (Traffic Cell) घटक स्थापन करणे व त्याकरीता असिस्टन्ट ट्रान्सपोर्ट प्लानर तथा उप परिवहन नियोजक या पदाची निर्मिती करुन त्यास महाराष्ट्र शासनाची शासन निर्णय क्र.पी.सी.सी.३०९१/४०२/ प्र.क्र.८९/९१/नवि - २२ दिनांक २१ डिसेंबर १९९१ अन्वये मान्यता घेतलेली आहे. १९९१ ते मे २०१२ पर्यंत या पदावर महानगरपालिकेने कोणाचीही रितसर नियुक्ती केलेली नाही किंवा कोणी अधिकारी या पदावर काम करणेस उत्सुक नसावा कारण की या पदावरील अधिका-यास इतरांप्रमाणे पदोन्नतीची संधीच उपलब्ध नाही. मुंबई, पुणे महानगरपालिका, सिडको, मुंबई महानगर प्रादेशिक विकास महामंडळ (MMRDA) इत्यादी ठिकाणी असलेल्या पदोन्नतीच्या संधीप्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये असिस्टंन्ट ट्रान्सपोर्ट प्लानर या पदावरील अधिका-यास पुढील पदोन्नतीच्या संधी सोबतचे प्रपत्र अ मध्ये नमुद केल्याप्रमाणे देणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून ट्रान्सपोर्ट प्लानर तथा परिवहन नियोजक व सिनियर ट्रान्सपोर्ट प्लानर तथा वरिष्ठ परिवहन नियोजक या दोन पदांची नविन निर्मिती करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक २) संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.स्था/बीआरटीएस/१६८/१२दि.४/६/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.५९६ दि.१२/६/२०१२

सन २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या मागील तीन आर्थिक वर्षात मनपाची सुधारलेली आर्थिक परिस्थिती विचारात घेवून जागतिक बँकेकडून [१)डांगे चौक येथे उड्डाणपूल बांधणे र.रू.१० कोटी, २)बीआरटीएस बसस्टॉप व बसमध्ये ITS यंत्रणा उभी करणे र.रू.७ कोटी ३)तीन बस टर्मिनल व पार्कींग विकसित करणे र.रू.१२ कोटी ४)मुंबई पुणे व औंध-रावेत बीआरटीएस रस्त्यावर पादचाऱ्यांसाठी सुविधा निर्माण करणे र.रू.१० कोटी) असे एकूण र.रू.३९.०० कोटी इतके कर्ज कमी करणेकामीची बाब अवलोकनार्थ मा.महापालिका सभेकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

विषय क्रमांक ३) संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक
क्र.लेखा/६/कावि/१३३६/१२ दि.४/६/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६२५ दि.१३/६/२०१२

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत तारखा विहित करणे आवश्यक असल्याने महापालिका आयुक्त यांनी महापालिकेचे अंदाजपत्रक कलम ९५ अन्वये दरवर्षी २० फेब्रुवारीपुर्वी मा.स्थायी समितीला सादर करावे, याप्रमाणे तारखा विहीत करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीने तयार केलेले सन २०१२-१३ चे मुळ अंदाजपत्रक “अ”, “क” तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत महापालिकेने नमुद केलेल्या प्रशासकीय सुधारणांचा विचार करून शहरी गरीबांसाठीचे “प” अंदाजपत्रक तयार केलेले आहे. त्याप्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्रकल्पांसाठी प्राप्त शासन अनुदान व मनपा हिस्सा याबाबतचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदरचे अंदाजपत्रक “अ”, “क” व “प” तसेच जे.एन.एन.यु.आर.एम. प्रकल्पांचे अंदाजपत्रक विचारासाठी.

विंषय क्रमांक ५) संदर्भ:-१) मा.निता पाडाळे व मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव-
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.६८४ दि.२८/६/२०१२

महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत अपंग कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. यामधील मा.महापालिका सभा ठराव क्रमाक ९४४ दिनांक २३/७/२०१० अन्वये घटक योजना क्र. ७ “महापालिका क्षेत्रातील१८ वर्षापुढील मतिमंद व्यक्तींचा सांभाळ करणा-या महापालिका हद्यीतील नोंदणीकृत स्वयंसेवी संस्थेस अथवा मतिमंद व्यक्तीच्या पालकांस अर्थसहाय्य” यामध्ये “१८ वर्षावरील मतिमंद व्यक्ती प्रमाणेच वयवर्षे ५ ते १८ वयोगटातील मतिमंद बालक/व्यक्ति यांना देखील वार्षीक र.रु. १२०००/- ( अक्षरी रक्कम रुपये बारा हजार फक्त) अर्थसहाय्य” अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ६) संदर्भ:- १) मा.विनया तापकीर,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव...
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.७२९ दि.३/७/२०१२

चिंचवड स.नं.१६५ प्रेमलोक पार्कमधील शाळा इमारत मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडे दराने व योग्य त्या अटीशर्तीवर नॉव्हेल इन्स्टिटयूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट अँड रिसर्च, चिंचवड या संस्थेस ३५ वर्षे कालावधीकरीता भाड्याने देण्यास व त्याकामी करारनामा करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ७) संदर्भ :- १) मा.महापालिकि आयुक्त यांचे जा.क्र.पापु/६६५/१२
दि.९/७/२०१२
२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.७६३ दि.१०/७/२०१२

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पाणी बिलाबाबत प्रस्तावासोबतच्या तक्त्यात नमूद प्रमाणे धोरणास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

------

## मा.विधी समितीचे ठराव

विषय क्रमांक ८ ) संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशासन/१/कावि/४५७/२०१२,
दि. १८/०६/२०१२
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२५ दि.६/७/२०१२

डॉ. श्री. उदय टेकाळे, सहा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक २७/०८/२०१२ पासून १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक ९) संदर्भ :- १) मा. महापालिका आयुक्त यांचे पत्र
क्र.प्रशा/१अ/कावि/५०८/२०१२, दि. ३/७/१२
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.२८ दि.६/७/२०१२

शासन निणर्याने “सहाय्यक आयुक्त” पदास लागू केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील “प्रशासन अधिकारी” पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू असून “उप आयुक्त” पदास लागू केलेल्या वेतनश्रेणीपेक्षा “सहाय्यक आयुक्त” पदास वरिष्ठ वेतनश्रेणी लागू आहे. “क” वर्ग महानगरपालिकांच्या आकृतीबंधामध्ये उपआयुक्त अभिनामाची पदे अस्तित्वात असून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये अशी पदे अस्तित्वात नसल्याने वेतन वा इतर कोणत्याही बाबीमध्ये बदल न करता “सहाय्यक आयुक्त” पदाचे पदनाम बदलून “उप आयुक्त” व “प्रशासन अधिकारी” अभिनामाचे पदाचे पदनाम बदलून “सहाय्यक आयुक्त” असे करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

## मा.शहर सुधारणा समितीचे ठराव

विषय क्रमांक १०) संदर्भः-१) मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.नरवि/कावि/ ड-
१ /२६५/२०१२, दि.३०/०४/२०१२
२) मा.शहर सुधारणा समिती सभा ठ.क्र.११
दि.२/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.६७
दि.९/०७/२०१२ अन्वये.

मौजे वाकड येथील पिंपरी चिंचवड नवनगरविकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेतील स.नं.२११ पैकी क्षेत्र जलाशय विभागाऐवजी निवासी विभागात समाविष्ट करणेकामी जाहिर नोटीशीचे अनुषंगाने ३० दिवसाचे विहित मुदतीत इकडील विभागास एकही हरकत प्राप्त झाली नाही. त्यामुळे सदरचे प्रस्तावास म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेकामी मान्यता व प्रस्ताव शासन

मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे,
(टिप- माहे जुलै २०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमाक ११) संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१८ दि.१६/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७०
दि.९/०७/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने विकास योजने व्यतिरिक्त कलम २०५ नुसार घोषित केलेल्या सध्या बाधीत मिळकत धारकांना एफ.एस.आय. देणेत येतो. परंतु सदर बाधीत मिळकत धारकांना सदर जागेचा टी.डी.आर. देण्यात यावा. सदर बाधीत जागेचा फक्त एफ.एस.आय. न देता टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.
(टिप- माहे जुलै २०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक १२) संदर्भ :- १) मा.उल्हास शेट्टी मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव -
२) मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.१९ दि.१६/५/२०१२
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.७१
दि.९/०७/२०१२ अन्वये.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रस्ता व आरक्षणे ताब्यात घेऊन खाजगी जागामालकांच्या मिळकतीवर विकास कामे केली आहेत. सदर जागांचे रितसर भूसंपादन करण्यात आलेले आहे व अवॉर्ड सुध्दा जाहीर झालेले आहे. परंतु ज्या जागामालकांनी त्याचा मोबदला भूसंपादनाने घेतलेला नाही अशा सर्व बाधीत मिळकतींना टी.डी.आर. किंवा एफ.एस.आय. देणेत यावा. यास कलम ३७ अन्वये फेरबदल प्रस्ताव करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.
(टिप- माहे जुलै २०१२ चे सभेमध्ये घेणेचे निर्णयाप्रमाणे)

विषय क्रमांक १३) संदर्भ :- १) मा. नारायण बहिरवाडे, मा. प्रशांत शितोळे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२७ दि. १९/६/२०१२

पिंपरी चिंचवड शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील ४५.०० मीटर रुंद रस्ता चिंचवड येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळ यांच्या रेखांकनामधील सार्वजनिक / निम सार्वजनिक (Public Semipublic) या भूखंडावर प्रस्तावित आहे. परंतु या भूखंडावर साधारण सन १९५० पासून लिंगायत समाजाची दफन भूमी अस्तित्वात आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहरात लिंगायत समाजाची लोकसंख्या बरीच असून पिंपरी चिंचवड शहरात या समाजाची ही एकमेव दफन भूमी आहे. तरी वरील बाबींचा विचार होऊन पिंपरी चिंचवड येथील लिंगायत समाजाच्या भावना न दुखावता

शहराच्या सुधारित मंजूर विकास योजनेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या रेखांकनामधील चिंचवड स.नं. २२१ मधील सार्वजनिक व निमसार्वजनिक या भूखंडावरील ४५.०० मी. रस्त्याने बाधीत होणारे क्षेत्र लगत उपलब्ध असलेल्या जागेतून मिळावे तो पर्यंत सदर भूखंडावर कोणतेही काम करण्यात येऊ नये यास मान्यता देणेत यावी अशी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १४) संदर्भ :- १) मा. सिमा सावळे, मा. यमुनाताई पवार यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२८ दि. १९/६/२०१२

कासारवाडी येथे भाजी मंडईचे आरक्षणामध्ये इमारत विकसित केलेली आहे. परंतु सद्यस्थितीत जागेवर सदर इमारतीमध्ये दवाखाना, करसंकलन कार्यालय, ग्रंथालय इ. वापर सुरु आहे. सदर भाजीमंडई आरक्षणातील विकसित केलेल्या इमारतीमध्ये भाजी विक्रेत्यांचा प्रतिसाद न मिळाल्याने सदर ठिकाणी मनपाने दवाखाना सुरु केलेला आहे. सदर परिसरात भाजी विक्रेते हे जवळच रेल्वे लाईनलगत असलेल्या वाहनतळाच्या जागेत बसून भाजी विकतात. त्यामुळे वाहनतळाच्या आरक्षणऐवजी सदर ठिकाणी भाजीमंडई विकसित केल्यास भाजीविक्रेत्यांच्या सोईचे होईल तसेच महापालिकेसही त्यापासून उत्पन्न मिळू शकेल. तरी त्याप्रमाणे आरक्षण वापरात बदल करणेकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

विषय क्रमांक १५) संदर्भ :- १) मा. प्रशांत शितोळे, मा.नारायण बहिरवाडे यांचा प्रस्ताव
२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र.२९ दि. १९/६/२०१२

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अनेक सर्वसामान्य नागरिकांनी स्वतंत्र घरे बांधली आहेत व उद्योगनगरीमध्ये या नागरिकांनी अर्धा गुंठा, एक गुंठा, दिड गुंठा, दोन गुंठे इतक्या जागेत घरे बांधली आहेत. मनपाने या जागांवर सध्या अस्तित्वात असणा-या देय निर्देशंका व्यतिरिक्त जागेच्या क्षेत्रफळाच्या दुप्पट निर्देशांक देणेत यावा व इतर नियमांमध्ये आवश्यक त्याप्रमाणे बदल करावा जेणेकरुन शहरातील अनाधिकृत बांधकामांना आळा बसेल, शहरातील मुलभूत सुविधा यामधे पाणीपुरवठा, विद्युत, ड्रेनेज, आरोग्य या सुविधांवर येणारा ताण कमी होईल. त्यामुळे सदर प्रस्तावाबाबत मनपाचा धोरणात्मक निर्णय घेवून शहरातील नागरिकांना दिलासा मिळावा म्हणून सदर प्रस्तावास मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

-------

## आयुक्तांकडून आलेली पत्रे

विषय क्रमांक १६) संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.नस/४/कावि/९४०/२०१२ दि.०३/०७/२०१२

सहाय्यक कुलसचिव, पुणे विद्यापीठ यांनी दिनांक २१/०६/२०१२ चे पत्रानुसार महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २५(२)(एए) मधील तरतुदीनुसार मा.कुलगुरुंनी विद्यापिठ क्षेत्रातील नगरपरिषदांच्या / महानगरपालिका सदस्यांपैकी एका सदस्यास विद्यापीठ अधिसभेवर (सिनेट) एक वर्षासाठी चक्रक्रमाने नामनिर्देशन करावयाचे असल्याचे कळवून त्यासाठी आपल्या महापालिकेच्या सदस्यांपैकी किमान पदवीधर असलेल्या एका सदस्याची माहिती पाठविणेकामी कळविले आहे.

सबब पुणे विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे एक वर्षासाठी किमान पदवीधर असलेल्या एका सदस्याचे नामनिर्देशन करणेबाबतचा प्रस्ताव मा.महापालिका सभेपुढे निर्णयार्थ ठेवणेत यावा.

-----

## मा.विशेष समित्यांचे वृत्तांत

### मा.विधी समिती

विषय क्रमांक १७) अ) दि.१८/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.१/६/२०१२ व १५/६/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-------

### मा.महिला व बालकल्याण समिती

विषय क्रमांक १८) अ) दि.२३/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.
ब) दि.१३/६/२०१२ (दु.२.०० व २.१५) चा सभावृत्तांत कायम करणे.

------

<u>मा.शहर सुधारणा समिती</u>

विषय क्रमांक १९) दि.१५/५/२०१२ व १६/५/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

------

<u>मा.क्रिडा समिती</u>

विषय क्रमांक २०) दि.६/६/२०१२ चा सभावृत्तांत कायम करणे.

-----

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि /९८१ / २०१२
दिनांक :- १०/०७/ २०१२

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे [ डॉकेटस ]
नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.

**प्रपत्र - अ**

मा.स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ५७८ दिनांक १२/०६/२०१२ चे लगत

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | शैक्षणिक अर्हता व अनुभव | पद भरणेची पध्दत | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | असिस्टंट ट्रान्सपोर्ट प्लानर तथा उप परिवहन नियोजक | पे स्केल १५६०० - ३९१०० ग्रेड पे ५४०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी बी.ई. (सिव्हिल) आणि परिवहन अभियांत्रिकीची पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम<br>२. वाहतूक आणि दळण वळण शाखेकडील कामाचा अनुभव आवश्यक | सरळसेवा | पद मंजूर आहे. |
| २ | ट्रान्सपोर्ट प्लानर तथा परिवहन नियोजक | पे स्केल १५६०० - ३९१०० ग्रेड पे ६६०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी बी.ई. (सिव्हिल) आणि परिवहन अभियांत्रिकीची पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम<br>२. वाहतूक आणि दळण वळण शाखेकडील ३ वर्षे कामाचा अनुभव आवश्यक<br>३. यापैकी किमान २ वर्षे उप परिवहन नियोजक पदाचा अनुभव | पदोन्नतीने | नविन पद |
| ३ | सिनियर ट्रान्सपोर्ट प्लानर तथा वरिष्ठ परिवहन नियोजक | पे स्केल १५६०० - ३९१०० ग्रेड पे ७६०० | १. स्थापत्य अभियांत्रिकी शाखेची पदवी बी.ई. (सिव्हिल) आणि परिवहन अभियांत्रिकीची पदव्युत्तर पदवी किंवा तत्सम<br>२. वाहतूक आणि दळण वळण शाखेकडील ५ वर्षे कामाचा अनुभव आवश्यक<br>३. यापैकी किमान ३ वर्षे परिवहन नियोजक पदाचा अनुभव | पदोन्नतीने | नविन पद |

**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८